JETIR.ORG ISSN: 2349-5162 | ESTD Year : 2014 | Monthly Issue
JOURNAL OF EMERGING TECHNOLOGIES AND INNOVATIVE RESEARCH (JETIR)
An International Scholarly Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# मानवी जीवनात तत्त्वज्ञानाचे महत्व

**Dr. Vaishali Jagannath Ragde (Jadhao)**
**Principal**
Late Narmadabai Bodkhe Adhyapak Mahavidyalaya, Telhara
Dist. Akola. (Maharashtra) India

तत्त्वज्ञान ही एक प्रारंभिक व मूलभूत शिस्त आहे. तत्त्वज्ञान हा ज्ञानाचा अगदी जुना व आदरणीय प्रांत आहे. थॅलस या ग्रीक तत्त्ववेत्याच्या मते, "माणसासमोर असणारे सर्वांत मोठे आव्हान म्हणजे "माणसाला ओळखणे." जगाच्या प्रारंभापासून अनेक विद्वानांनी, जीवशास्त्रज्ञांनी, मानसशास्त्रज्ञांनी व तत्त्ववेत्यांनी आपापल्या पध्दतीने माणसाला समजून घेण्याचे प्रयत्न केलेले आहेत. माणसाला समजून घेण्याचा महत्वाचा मार्ग म्हणजे माणसाची व्युत्पत्ती, त्याची जीवन ध्येये, त्याचे विविध नातेसंबंध साध्य करण्याचे मार्ग. या सर्वांचा तत्त्वज्ञानाच्या माध्यमातून अभ्यास करणे. व्यक्ती आणि समाज यांच्या समन्वयाला तत्वज्ञान मदत करते. माणसाच्या संपूर्ण जीवनाशी तत्त्वज्ञान एकरुप झाले आहे, असे ॲरिस्टॉटलचे मत आहे. प्रत्येकजण स्वत:च्या तत्त्वज्ञानानुसार जीवन जगत असतो, मग त्याला त्याची जाणीव असो वा नसो. माणूस सुसंस्कृत असो अथवा आदिमानव, शिक्षित असो वा अशिक्षित, सामान्य बुध्दीचा असो किंवा हुशार तो तत्वज्ञानाच्या कचाट्यातून सुटलेला नाही.

तत्त्वज्ञानाची संकल्पना गतिमान आहे. काळाबरोबर ती बदलते. खऱ्या अर्थाने तत्त्वज्ञान म्हणजे सत्य आणि शहाणपणा यांचा पाठलाग होय. तत्वज्ञान हा वास्तवतेचा व सामान्य तत्त्वांचा अभ्यास असून उत्कृष्टतेचा तो पाठलाग आहे. मानव, निसर्ग व वस्तुजातांकडे पाहण्याचा एक मार्ग म्हणजे तत्त्वज्ञान. संपूर्ण विश्वातील सर्व बाबींचा पध्दतशीर अभ्यास तत्त्वज्ञानच करते. तत्त्वज्ञान म्हणजे ज्ञानाचा जीवंत झराच.

सर्वसामान्य माणसाचा तत्त्वज्ञानाशी काही संबंध नाही असा एक समज आहे. तत्त्वज्ञानी माणसे अव्यवहारी असतात असाही एक गैरसमज आहे. परंतु हे विचार अयोग्य आहेत. तत्त्वज्ञानाचा संबंध प्रत्येक माणसाच्या जीवनाशी आहे. प्रत्येकाचे जीवन जगण्याचे एक तत्त्वज्ञान असते. सज्जनांचे जसे एक जीवनविषयक तत्त्वज्ञान असते तसे दुर्जनांचे देखील जीवनविषयक तत्वज्ञान असते. तत्त्वज्ञान माणसाला जीवनाचा अर्थ समजण्यास मदत करते. दीपस्तंभाप्रमाणे तत्त्वज्ञान माणसाला जीवनाची ध्येय दाखविते. तत्त्वज्ञानामुळे माणसाच्या जीवनाला तात्विक बैठक प्राप्त होते. प्लेटो, सॉक्रेटिस, ॲरिस्टॉटल, म. गांधी सारखे तत्त्वज्ञानी जीवनाचा समग्र दृष्टीने विचार करतात व अढळपदी विराजमान होऊन मानवी जीवनाची ध्येये निश्चित करतात. ध्येयनिष्ठ, कर्तव्यतत्पर, सदाचारी, समाधानी व विवेकी जीवन कसे जगावे याबद्दल तत्त्वज्ञान मार्गदर्शन करते.

धर्माप्रमाणेच तत्त्वज्ञानाला जीवनात फार महत्व आहे. जीवनाला मार्गदर्शन करणारे धर्मग्रंथ म्हणजे तत्त्वज्ञानाची विविध रुपे आहेत. कुरुक्षेत्रावर संभ्रमित झालेल्या अर्जुनाला कर्तव्याच्या प्रेरणा देणारा "गीता" हा धर्मग्रंथ अखिल मानव

जातीच्या जीवनाचे महान तत्त्वज्ञान आहे. रामायण, महाभारत, बायबल, कुराण हे धर्मग्रंथ म्हणजे तत्त्वज्ञानाची विविध रुपेच आहे. गीतेमधील

**"कर्मण्येवाधिकारस्ते । मा फलेषु कदाचन ।।.....**

हे कर्मयोग्याचे तत्त्वज्ञान आहे. फळाची अपेक्षा न करता माणसाने फक्त कर्म करीत राहावे हा कर्तव्याची प्रेरणा देणारा संदेश आपणाला गीतेतून मिळतो.

जीवनात सुख आणि दु:ख, लाभ आणि नुकसान, जय आणि पराजय यांच्याकडे सारख्याच भावनेतून पाहता यावे म्हणून तत्त्वज्ञानाची गरज आहे. स्वार्थ आणि परमार्थ यांच्यातील योग्य सीमारेषा माणसाला तत्त्वज्ञानामुळे समजते.

तत्त्वज्ञानाला आपत्तीचे गोडे दुध असे म्हणतात. माणूस आपदग्रस्त किंवा संकटात असतो तेव्हा त्याला तत्त्वज्ञान आठवते. असे म्हणतात की, सुखाधीन अवस्थेत तत्त्वज्ञान निद्रित असते व दु:खधीन अवस्थेत तत्त्वज्ञान जागृत असते. संकटात माणसाला धर्म, तत्त्वज्ञान व नीती आठवते. सुखाच्या वेळी त्यांची आठवण प्रकर्षाने होत नाही. विजयात विवेक व पराजयात धीर धरण्याचे मार्गदर्शन तत्त्वज्ञानच करते. विजयाने उन्मत होऊ नये व पराजयाने खचून जाऊ नये हा मौल्यवान उपदेश तत्त्वज्ञानच आपणाला देते. सत्यनिष्ठ, सात्विक व विवेकशील जीवन कसे जगावे हे तत्त्वज्ञानच आपणाला सांगते. सुखलोलुप जीवनात गुरफुटून ध्येयनिष्ठ व सदाचारी जीवनापासून दूर जाऊ नये हा मौलिक सल्ला तत्त्वज्ञानच देते. शांती, प्रेम, दया व करुणा यांचे जीवनातील स्थान फार मोठे आहे.

दान, दया व दम हीच मानवी जीवनाची मूल्ये आहेत. दानातच धर्म, परोपकार व त्याग आहे. दयेत करुणा व मानवता आहे. दमात सहनशीलता व सहिष्णुता आहे. या मूल्यांच्या आचरणाने मानवी जीवन सफल होते व जीवनाचे सार्थक होते. हेच जीवनाचे प्रयोजन आहे. म्हणून तत्त्वज्ञान आपणाला जीवनाचा खरा मार्ग दाखवते.

**संदर्भ ग्रंथसूची :**


1) देशमुख प्रा. एल. जी, शिक्षणाचे तत्वज्ञान व समाजशास्त्र, कोल्हापूर फडके प्रकाशन मे 1998.
2) पारसनीस डॉ. न. रा, शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र पुणे, नुतन प्रकाशन 1987.
3) कोंडेकर प्रा. ए. वाय, भारतातील आजच्या सामाजिक समस्या, फडके प्रकाशन 1992
4) देशमुख प्रा. एल. जी, शिक्षणाचे तत्वज्ञानात्मक व समाजशास्त्रीय अधिष्ठान, फडके प्रकाशन कोल्हापूर, जून 2007.